वर्ष-०८ | अंक-२१ | मुंबई, मंगळवार १२ ते १८ एप्रिल - २०२२ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

PG 2

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

परप्रांतीय भंगार व्यावसायिकावर स्थानिकांचा हल्ला

3 → धक्कादायक! कुटुंबावर 20 जणांच्या टोळक्याचा हल्ला

ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या घराची झाडाझडती, आज बेल की जेलचा फैसला? ← 4

## दिवसाढवळ्या बिल्डरची हत्या
## गोळीबाराच्या घटनेचं CCTV समोर



नांदेड : शहरातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक संजय बियाणी यांची दिवसाढवळ्या हत्या झालीये. मोटारसायकलवरुन आलेल्या हल्लेखोरानं त्यांच्यावर गोळीबार केला. त्यांच्यावर 7 ते 8 गोळ्या झाडण्यात आल्या. यातील 4 गोळ्या बियाणी यांना लागल्याची माहिती आहे. तर त्यांच्या चालकालाही एक गोळी लागली आहे. खंडणीतून ही हत्या झाल्याचा संशय आहे. तपासासाठी विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आल्याचं पोलीस अधीक्षकांनी सांगितलं. खंडणीसाठी रींदा गँगनं धमकी दिली असताना त्यांची सुरक्षा का काढण्यात आली, असा सवाल खासदार प्रताप चिखलीकर यांनी केला आहे. या हत्येने शहरात एकच खळबळ उडाली आहे.संजय बियाणी सकाळी 11 वाजेच्या सुमारास घरी परतले. गाडीतून उतरून बियाणी घरामध्ये जात असताना दुचाकीवर त्यांचा पाठलाग करणारे दोघेजण त्यांच्या दिशेने आले. बियाणी यांना काही कळण्याच्या आत दोन्ही हल्लेखोरांनी आपल्या बंदुकीतून अगदी जवळून त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. बियाणी तिथेच निपचित पडले. हल्लेखोरांनी घराचे गेट उघडणाऱ्या त्यांच्या घरात असणाऱ्या दुसऱ्या ड्रायव्हरवरही एक गोळी झाडली. संजय बियाणी यांना त्यांच्याच गाडीतून तात्काळ खाजगी रुग्णालयात आणण्यात आले. पण त्यांचा मृत्यू झाला.

# नंदुरबार मधून मोटर सायकल चोरी करणाऱ्या आरोपींना विसरवाडी पोलिसांनी सुरत येथे ठोकल्या बेड्या

नंदुरबार : विसरवाडी पोलीस ठाणे, नंदुरबार ,यांनी मोटार सायकलसह मोबाईल चोरी करणाऱ्या तीन आरोपींना सुरत येथून चोरी च्या गुन्हयाखाली अटक केली आहे. सविस्तर माहितीनुसार पळसुन जि.नंदुरबार येथे राहणारे गोविंद रामचंद्र कोकणी वय ३० हे दि.३१ ०३ २०२२ रोजी विसरवाडी गावाजवळ रिलायन्स पेट्रोलपंपाजवळ रोडच्या लगत लघुशंकेसाठी गेले असता,त्यांच्या मालकीची काळया रंगाची शाईन मोटर सायकल व विवो कंपनीचा मोबाईल असा एकुण ३६०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल अज्ञात तीन चोरट्यांनी चोरुन नेला म्हणुन त्यांनी विसरवाडी पोलीस ठाणे येथे अज्ञात आरोपींन विरुध्द चोरीचा गुन्हा दाखल केला होता. सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी श्री.पी.आर.पाटील, पोलीस अधिक्षक. नंदुरबार यांनी पोलीस पथकास आदेश केले होते .

सदर गुन्हयाचा स्थानिक गुन्हे शाखेकडुन तपास सुरु असतांना दि.०६/०४/२०२२ रोजी स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र कळमकर यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,सुमारे ०६ ते ०७ दिवसापुर्वी विसरवाडी पोलीस ठाणे हद्दीतील मोटारसायकल व मोबाईल चोरणारे हे उधना, सुरत येथील आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री रविंद्र कळमकर यांनी



तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक तयार करुन उधना सुरत येथे रवाना केले.उधना सुरत येथे गेलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडे संशयीत आरोपींचे फक्त वर्णन होते. त्यामुळे उधना सुरत सारख्या गजबजलेल्या शहरात संशयित आरोपींचा शोध घेण्यात अडचणी येत होत्या. परंतु स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ०२ ते ०३ दिवस सुरत उधना येथे अहोरात्र मेहनत घेवुन संशयीत आरोपींचा ठावठिकाणा शोधून आरोपी रहात असलेल्या परिसरात वेशांतर करुन सापळा रचला व दि.०८/०४/२०२२ रोजी पहाटे ०४ वाजेच्या सुमारास सदर गुन्हयातील एका संशयीत पंकज मच्छिद्र सैंदाणे वय १९ रा. उधना, सुरत गुजरात यास त्याब्यात घेऊन विसरवाडी येथील मोटारसायकल व मोबाईल' चोरी बाबत विचारपुस केली असता, त्याने पोलीसांना उडवा उडवीची उत्तरे दिली मग पोलिसांनी त्याची अधिक चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा त्याचे इतर दोन साथीदार रियाज व दिपक यांच्या मदतीने केला असल्याची माहिती सांगितली. त्यास मोटारसायकल बाबत विचारले असता, त्याने विसरवाडी येथुन चोरी करुन आणलेली मोटारसायकल घराच्या मागील बाजुस लपवून ठेवलेली आहे व मोबाईल बंद करुन कपाटात ठेवलेला आहे.

त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोटारसायकल व मोबाईल हस्तगत केला.व यागुन्हात सामील असलेले आरोपी १) पठाण रियाज रज्जाक खान वय २६ रा. संजय नगर, उधना सुरत गुजरात राज्य २) दिपक अनिलभाई जयस्वाल उप दिपक अनिलभाई हरिजन वय १८ वर्ष रा. उधना, सुरत (गुजरात राज्य) यांना ताब्यात घेतले असता त्यांनीही आपला गुन्हा पोलिसांसमोर कबूल केला आहे . ताब्यात घेण्यात आलेल्या तीन आरोपी व गुन्हयातील चोरीस गेलेली ३१०००/- रुपये किमतीची मोटार सायकल व ५००० रुपये किमतीचा मोबाईल तसेच २००००/- रुपये किमतीची गुन्हा करते वेळी वापरलेली स्कुटी असा एकुण ५६०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करुन आरोपी व मुद्देमाल गुन्हयाच्या पुढील तपासासाठी विसरवाडी पोलीस ठाणे येथे जमा करण्यात आलेला असून तीनही आरोपीना अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधिक्षक श्री. पी.आर पाटील, प्रभारी पोलीस अधिक्षक श्री विजय पवार, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र कळमकर,पोहेका प्रमोद गुलाबराव सोनवणे, पोना दादाभाई दामु मासुळ,पोना जितेंद्र उदयसिंग ठाकुर, पोना मोहन पांडुरंग ढमढेरे, चापोना रमेश सांळुखे, पोशि राजेंद्र चिंतामण काटके, पोशि शोएब जब्बार शेख यांचे पथकाने केली आहे. तसेच सदर गुन्हा उघडकीस आणल्याबद्दल मा. प्रभारी पोलीस अधीक्षक श्री विजय पवार यांनी तपास पथकाचे अभिनंदन केले आहे.

## जुगाराचा नाद कुटुंबाचा घात

### पोलिसाचा पत्नीसह सासू-सासऱ्यावर हल्ला



नाशिक : महाराष्ट्राला हादवणारी घटना नाशिकमध्ये समोर आली आहे. नाशिकरोड पोलिस दलात कार्यरत असलेल्या एका पोलीस कर्मचाऱ्याने घरगुती वादातून पत्नी , सासरे आणि सासू यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात सासऱ्याचा मृत्यू झाला असून पत्नी आणि सासू मृत्यूशी झुंज देत आहेत.

**नेमकी घटना काय**

सूरज उगलमुगले हा नाशिकरोड पोलिस दलात कार्यरत आहे. सूरजला जुगार आणि सट्टा खेळण्याचा नाद होता. जुगारात कर्जबाजारी झालेला सूरज वारंवार सासऱ्याकडे पैशांची मागणी करत होता. पण सासऱ्यांनी पैसे देण्यास नकार दिल्याने सूरज संतापला होता. शनिवारी रागाच्या भरात सूरजने सासरे निवृत्ती सांगळे, पत्नी पुजा आणि सासू शिला सांगळे यांच्यावर तीक्ष्ण हत्याराने जीवघेणा हल्ला केला.

# 'किरीट सोमय्या मुलासह फरार, लूक आऊट नोटीस जारी करा'



मुंबई : शिवसेना खासदार संजय राऊत (Sanjay Raut) यांनी पुन्हा एकदा भाजप नेते किरीट सोमय्या (Kirit Somaiya) यांच्यावर निशाणा साधला आहे. I N S विक्रांतच्या (I N S Vikrant Scam) नावावर जो घोटाळा झाला आहे. हा छोटा घोटाळा नसून त्याची व्याप्ती खूप मोठी आहे. किरीट सोमय्या त्यांचा मुलगा निल सोमय्या आणि त्यांच्या माफिया टोळीने संपूर्ण महाराष्ट्रबरोबरच देश-विदेशातून पैसा गोळा केला. ही माफिया गँग बिल्डरांकडूनही पैसे गोळा करते, असा आरोप केला आहे.

विक्रांत बचावच्या नावाखाली गोळा केलेल्या पैशांचा गैरवापर झाला आहे. त्याचा तपास होईल. हे दोन ठग कुठे गायब आहेत, यावर भाजपकडून अजून कोणतीही अधिकृत माहिती दिली जात नाही. त्यांना कुठे लपवण्यात आलं आहे. ते दोघंही महाराष्ट्राच्या बाहेर आहेत असा दावाही संजय राऊत यांनी केला आहे.

त्यांचा जामीन होत नाही तोपर्यंत त्यांना लपवलं जाईल, ते विदेशातही जाऊ शकतील, त्यामुळे त्यांच्याविरुद्ध लूक आऊट नोटीस जारी केली जावी, मेहूल चोक्सी आणि किरीट सोमय्या यांचा जुना संबंध आहे. त्यामुळे मेहूल चोक्सी जिथे आहे तिथे तर सोमय्या लपले नाहीत नाहीत असा सवाल संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे.

एक माफिया गँग बोगस पुरावे गोळा करण्याचं काम करत आहे. राजभवनाने चुकीचं काही चुकीचं काम केलं तर त्यांची उरली सुरली इज्जतही संपेल, असा इशारा संजय राऊत यांनी राज्यपाल कोश्यारी यांना दिला आहे.

आरोपी कुठेही असतील तिथून मुंबई पोलीस पकडून आणतील असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

## पाळीव मांजराला काठीने मारहाण, मांजराचा मृत्यू
### महिलेवर गुन्हा दाखल




पुणे : मांजराला काठीने बेदम मारहाण केल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना गोखलेनगर भागात घडली. या प्रकरणी एका महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत प्रशांत दत्तात्रय गाठे (वय ५३, रा. शिर्के पिठाच्या गिरणी शेजारी, गोखलेनगर) यांनी चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी शिल्पा नीलकंठ शिर्के (रा. शिर्के पिठाच्या गिरणीशेजारी, गोखलेनगर) या महिलेच्या विरोधात प्राण्यांना क्रूरतेने वागणूक दिल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गाठे यांनी मांजर पाळले होते. मांजर शिर्के यांच्या घरात शिरल्याने शिल्पाला राग आला. तिने काठीने मांजराला मारहाण केली.

## महाराष्ट्र हादरला! पत्नी-मुलाची हत्या केली
# व्हिडिओ रेकॉर्डींग पाठवून मेहुण्याला म्हणाला मयताला ये




नाशिक : नाशिकमधल्या (Nashik) श्रीरामपूर इथं एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका नराधमाने पत्नी आणि पाच वर्षांच्या मुलाची हत्या करुन त्याचं व्हिडिओ रेकॉर्डिंग केलं आणि ते नातेवाईकांना पाठवलं. रामनवमीच्या दिवशीच ही घटना घडल्याने जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

काय आहे नेमकी घटना?

बलराज दत्तात्रय कुदळे असं आरोपीचं नाव असन तो ट्रकचालक आहे. आरोपी पत्नी अक्षदा आणि पाच वर्षांचा मुलाग शिवतेज यांच्यासह श्रीरामपुरमधल्या दिघी इथं शेतात राहत होता. आरोपी बलराज आणि त्याच्या पत्नीत गेल्या काही दिवसांपासून कौटुंबिक वाद होता. दररोजच्या भांडणाला कंटाळून अक्षदा मुलासह माहेरी निघुन गेली होती. नुकतीच ती माहेरहून सासरी आली होती.

पण आरोपी बलराजच्या डोक्यातला राग शांत झाला नव्हता. रविवारी सकाळी अक्षदा घरात काम करत असताना बलराजने पाठिमागून येत तिच्या डोक्यात कुदळ घातली. हा घाव इतका जबदस्त होता की अक्षदाचा जागीच मृत्यू झाला. आरोपी इतक्यावरच थांबला नाही त्याने पोटच्या मुलाला घराजवळ असलेल्या आंब्याच्या झाडाला दोरीने फाशी देऊन ठार केलं.

हत्या केल्याच्या घटनेचं रेकॉर्डिंग धक्कादायक म्हणजे मुलाचा जीव जाईपर्यंत दहा ते पंधरा मिनिटं तो तिथेच थांबला. या सर्व घटनेचं त्याने आपल्या मोबाईलवर व्हिडिओ रेकॉर्डिंग केलं आणि हा व्हिडिओ कुटुंबिय आणि गावकऱ्यांना पाठवला. चाकण इथल्या मेहुण्याला व्हिडिओ कॉल करुन त्याने पत्नी आणि मुलाचे मृतदेह दाखवले. तुझ्या बहिणीला आणि भाच्याला मारुन टाकलं, त्यांच्या मयताला ये असं सांगत आरोपीने कॉल कट केला.



## परप्रांतीय भंगार व्यावसायिकावर स्थानिकांचा हल्ला



दापोली : दापोली तालुक्यात देगाव येथे आज दुपारी एका परप्रांतीय भंगार व्यवसयिकाच्या घरावर स्थानिक ग्रामस्थांच्या जमावाने हल्ला करून त्याला बेदम मारहाण केली. याप्रकरणी पोलिस ठाण्यात २० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गंगासागर शुक्ला असे या भंगार व्यवसायिकाचे नाव असून जमिनीच्या वादातून हा हल्ला झाल्याची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, दापोलीसह संपूर्ण कोकणात भंगार व्यवसायासाठी मोठ्या संख्येने परप्रांतीय नागरिक दाखल झाले आहेत. मात्र या व्यवसायिकांचा बेकायदा व्यवहार करणाऱ्यांशी संबंध येत असल्याने अनेक भागात कायदा सुव्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची चर्चा होते. अशी प्रकरणं हाताळताना पोलिसांकडूनही सावध भूमिका घेतली जाते.

## अहमदनगरमधील मुनोत दाम्पत्य हत्या, एकाला फाशी तर पाच जणांना जन्मठेप

औरंगाबाद : अहमदनगरमधील रमेश मुनोत व चित्रा रमेश मुनोत या ज्येष्ठ दाम्पत्याची अत्यंत थंड डोक्याने नियोजनबद्ध आणि कटकारस्थान रचून निर्घृण हत्या करून दरोडा टाकल्याप्रकरणातील पाच जणांची जन्मठेप कायम ठेवत सुरक्षारक्षक असलेल्या मुख्य सूत्रधाराची शिक्षा फाशीत परिवर्तित करण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. व्ही. के. जाधव व न्या. एस. डी. कुलकर्णी यांनी शुक्रवारी दिला.

या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयातील काही प्रकरणांच्या आधारे आणि सुरक्षारक्षकच भक्षक होण्यासारखी दुर्मीळ घटना म्हणून नोंद घेत अतिरिक्त सरकारी अभियोक्ता शशिभूषण देशमुख यांनी युक्तिवादात मुख्य सूत्रधार शिवकुमार याला फाशीची शिक्षा देण्याची विनंती खंडपीठाकडे केली होती. शिवकुमार रामसुंदर साकेत, असे फाशीची शिक्षा सुनावण्यात आलेल्या मुख्य सूत्रधाराचे नाव आहे. तर राजू दरोडे, शैलेंद्रसिंग ठाकूर, राजेशसिंग ठाकूर, संदीप पटेल व बलेंद्रसिंग ठाकूर अशी जन्मठेप कायम ठेवण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. राजू दरोडे हा अहमदनगर जिल्ह्यातीलच रहिवासी तर शिवकुमारसह इतर चौघे हे मध्य प्रदेशातील रेवा



जिल्ह्यातील रहिवासी आहेत.

अहमदनगरच्या चंदन इस्टेटमधील माणिकनगर भागात राहणारे व्यावसायिक रमेश मुनोत व चित्रा मुनोत यांची ३ डिसेंबर २००७ रोजी घरातच अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. फाशी झालेला आरोपी शिवकुमार हा रमेश मुनोत यांच्याकडे सुरक्षारक्षक (वॉचमन) म्हणून काम करत होता. तर इतर आरोपींनीही मुनोत यांच्याकडे सुरक्षारक्षकासह चालक आदी प्रकारची इतरही कामे केलेली होती. त्यामुळे मुनोत कुटुंबीयांबाबतची सर्व माहिती आरोपींकडे होती. केवळ पैशांच्या हव्यासापायी अत्यंत निर्घृणपणे घरात इतर कोणी तरुण नसल्याचा फायदा घेत आरोपींनी मुनोत दामप्त्याची हत्या केली होती. चित्रा मुनोत यांना खुर्चीला बांधून त्यांचा गळा चिरला तर रमेश मुनोत यांच्या छातीत धारदार शस्त्र खुपसून त्यांची हत्या केली होती. घटनेदिवशी मुनोत यांची दोन्ही मुले बाहेरगावी गेलेली होती. तर विवाहित मुलगी परदेशात होती. शिवकुमार याच्याकडे दिवसाचे सुरक्षारक्षक म्हणून काम होते. पण घटनेदिवशी त्याने लवकर जायचे म्हणून बदलीवर येऊन काम करणारा सुरक्षारक्षक सुमित तिवारी याला थाप मारली व इतर सहकाऱ्यांना घराच्या परिसरात रात्री बोलावून घेतले होते. हे सचिन दळवी या साक्षीदारानेही पाहिले होते. सुमित तिवारी याला बांधून आरोपी घरात शिरले होते.

या प्रकरणी अहमदनगरच्या कोतवाली पोलीस ठाण्यात मृत मुनोत दाम्पत्याचे पुतणे सुनील मुनोत यांनी फिर्याद दिली. तर अहमदनगर जिल्हा व सत्र न्यायालयाने ६० साक्षीदार तपासून शिवकुमारसह सहाही जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेविरोधात आरोपींनी खंडपीठात अपील दाखल केले केले. तर सरकारकडून फाशीची शिक्षा सुनावण्यासाठी अपील दाखल केले. यामध्ये खंडपीठाने शिवकुमार याची जन्मठेपेची शिक्षा फाशीत परिवर्तित केली. तर इतर आरोपींची जन्मठेप कायम ठेवली.

## मोठी बातमी! पुणे-मुंबई हायवेवर कारची ट्रकला धडक; चौघांचा जागीच मृत्यू



पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर कारचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात कार मधील चार जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहीती समोर आली आहे. भरधाव कारने उभ्या ट्रकला धडक दिल्यानं हा अपघात झाल्याचं कळतंय.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाच्या कडेला उभा केलेल्या ट्रकला पाठीमागून भरधाव कारने धडक दिली. या भीषण अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. शनिवारी म्हणजेच आज दुपारी सव्वा चारच्या सुमारास ही घटना घडली आहे. स्कोडा कार भरधाव वेगाने जात होती आणि कारने ट्रकला धडक दिल्यानं अपघात झाल्याचं कळतंय. दरम्यान, या अपघातात कार चक्काचूर झाली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार M C A क्रिकेट स्टेडियमच्या समोरच हा अपघात झाला असल्याचं पोलिसांनी सांगितले आहे.. अपघाताची भीषणता एवढी होती की यात कार मधील चारही जणांचा मृत्यू झाला. पुण्याहून मुंबईकडे जात असताना हा अपघात झाला. घटनास्थळी महामार्ग पोलीस दाखल झाले असून मृतदेह कारमधून काढण्याचे काम सुरू आहे.

भरधाव स्कोडा कार चालकाने शंभर मीटरवर ब्रेक मारले असून त्याचे व्रण रस्त्यावर उमटले आहेत, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक सत्यवान माने यांनी दिली आहे.

## धक्का लागल्याने मारहाण, तरुणाचा मृत्यू, बदलापुरातील घटना, चौघे अटकेत

बारमध्ये धक्का लागल्याच्या क्षुल्लक वादातून झालेल्या हाणामारीत 29 वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना बदलापूरातील हेंद्रेपाडा भागात समोर आली आहे. सिद्धांत उर्फ सनी सरोज असे मृत तरुणाचे नाव असून हेंद्रेपाडा येथील सी नाईन बार ॲंड रेस्टॉरंटमध्ये हा धक्काबुक्कीचा प्रकार घडला. याप्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली आहे तर

बदलापूर पश्चिमेतील हेंद्रेपाडा भागात असलेल्या सी नाईन बार अँड रेस्टॉरंटमध्ये शनिवारी रात्री हा प्रकार घडला. सिद्धांत त्याच्या मित्रांसह या बारमध्ये दारू पिण्यासाठी गेला होता. त्यावेळी बाजूच्या टेबलवर दारू पिण्यासाठी बसलेल्या सहा अनोळखी इसमांपैकी एकाचा धक्का लागल्याने सिद्धांत याने त्या इसमाला व्यवस्थित बसण्याचा सल्ला दिला. मात्र त्याचा राग आल्याने एका इसमाने हॉटेलच्या आतच सिद्धांतला मारहाण सुरू केली. त्यावेळी हॉटेलमधील कर्मचारी आणि इतरांनी वाद थांबवला. मात्र हॉटेलच्या बाहेर पडताच पुन्हा सिद्धांत याला काही तरूणांनी घेरले. पुढे या वादाचे पर्यावसन हाणामारीत झाले. या दोन गटांमध्ये झालेल्या तुंबळ हाणामारीत सिद्धांत सरोज गंभीर जखमी झाला. यातच त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. याप्रकरणी बदलापूर पश्चिम पोलीस ठाण्यात अज्ञात इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मारहाणीचा हा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील




चित्रणाच्या आधारे राहुल पांचाळ, आदित्य मयेकर, अरूण वैद आणि नबी हिना शेख या चौघांना अटक करण्यात आल्याची माहिती बदलापूर पश्चिम पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक दत्ता गावडे यांनी दिली आहे. तर अक्षय वैती आणि सचिन कबुतर या दोघांची नावे समोर आली आहेत. त्यांचा पोलीस शोध घेत असल्याची माहिती गावडे यांनी दिली आहे. या प्रकरणामुळे बदलापुरात एकच खळबळ उडाली आहे.

### 'मूल जन्माला घालायचंय पतीला सोडा'

### पतीला सोडा' तुरुंगात जन्मठेप भोगत असलेल्या पतीच्या पॅरोलसाठी पत्नीचं अजब कारण!



जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या एका कैद्याला पत्नीच्या अजब मागणीनंतर 15 दिवसांचा पॅरोल देण्यात आला आहे. हा कैदी सध्या अजमेर कारागृहात आहे. त्यांच्या पत्नीने अजमेरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज सादर केला आणि 'आम्हाला मूल जन्माला घालायचं आहे, त्यासाठी पतीला 15 दिवसांचा पॅरोल मिळावा', अशी विनंती केली आहे. या अर्जाला जिल्हाधिकाऱ्यांनी प्रतिसाद न दिल्याने महिलेने उच्च न्यायालयात धाव घेतली. राजस्थान उच्च न्यायालयाचे न्यायाधीश संदीप मेहता आणि फर्जंद अली, जोधपूर यांच्या खंडपीठाने ही याचिका स्वीकारली आणि याचिकाकर्तीच्या पतीला 15 दिवसांसाठी पॅरोल मंजूर केला. भीलवाडा येथील 34 वर्षीय नंदलालला 6 फेब्रुवारी 2019 रोजी एडीजे कोर्टाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती, तेव्हापासून तो अजमेर तुरुंगात आहे. 18 मे 2021 रोजी त्याला 20 दिवसांसाठी पॅरोल मंजूर करण्यात आला होता. यानंतर ठरलेल्या तारखेला तो तुरुंगात परतला.

.. म्हणून रजा मंजूर करा!

या कैद्याच्या पत्नीने अजमेर जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज केला, जे पॅरोल समितीचे अध्यक्षही आहेत. या अर्जात तिने म्हटले की, 'आमचं लग्न झालं, पण आम्हाला मुलबाळ नाही. त्यामुळे मुलाच्या जन्मासाठी माझ्या पतीला 15 दिवसांचा पॅरोल देण्यात यावा.'

## पुणे विमानतळावर प्रवाशांकडून प्रवाळांचे ४६६ प्रकार जप्त ; सीमाशुल्क विभागाची कारवाई

दुबईहून आलेल्या दोन प्रवाशांकडून सीमाशुल्क विभागाने (कस्टम) प्रवाळांचे ४६६ प्रकार जप्त केले. प्रवाळांचा वापर शोभेसाठी केला जातो. जप्त करण्यात आलेले प्रवाळांचे विविध प्रकार मुंबईतील तारापोरवाला मत्स्यालयात पाठविण्यात आले आहेत. प्रवाळ तसेच परदेशातील वनस्पती आणण्यास परवानगीची आवश्यकता असलेल्या प्लास्टिक पिशवीत १०० प्रकार आढळून आले. कस्टमच्या पथकाने त्यांच्याकडील प्रवाळ जप्त केले. प्रवासी मूळचे मुंबईतील आहेत प्रवासी मूळचे मुंबईतील आहेत. त्यांची चौकशी करण्यात आली असता व्यवसायासाठी प्रवाळ आणल्याची माहिती दोघांनी दिली. प्रवाळांचे प्रकार मुंबईतील तारापोर मत्स्यालयात पाठविण्यात आले आहेत, अशी




असते. मात्र, या प्रवाशांनी नियमांची पूर्तता केली नव्हती.

पुणे आंतराष्ट्रीय विमानतळावर दुबईहून आलेले दोन प्रवासी उतरले. विमानतळाच्या परिसरातून (ग्रीन चॅनेल) दोघेजण घाईघाईत निघाले होते. त्या वेळी कस्टमच्या पथकातील अधिकाऱ्यांना संशय आला. दोघांकडे असलेल्या सामानाची तपासणी करण्यात आली. तेव्हा एका प्रवाशाकडील पिशवीत प्रवाळाचे ३६६ प्रकार आढळून आले. दुसऱ्या प्रवाशाकडे माहिती कस्टमच्या पुणे कार्यालयातील उपायुक्त धनंजय कदम यांनी दिली.

प्रवाळांचा वापर शोभेसाठी –

प्रवाळांचा वापर शोभेसाठी केला जातो. घरातील छोट्या मत्स्यालयात प्रवाळ ठेवले जातात. प्रवाळांची किंमत १२०० रुपये ते १८ हजार रुपयांपर्यंत असते. आकर्षकता लक्षात घेऊन प्रवाळाची किंमत ठरते. काही प्रवाळांचा वापर वैद्यकीय कारणांसाठी केला जातो.

## दहाव्या मजल्यावरुन उडी मारुन उच्चशिक्षित महिलेची आत्महत्या



घटस्फोट देण्याची मागणी करणाऱ्या पती, सासू, सासऱ्याच्या छळामुळे महिलेने इमारतीच्या दहाव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना खराडी भागात घडली. आत्महत्या करणारी महिला पुण्यात शिक्षणासाठी आली होती. या आत्महत्येस जबाबदार असल्याप्रकरणी पती, सासू, सासरे तसेच तिच्या मित्रावर गुन्हा दाखल करण्यात आला.मानसी यादव (वय २७, मूळ रा. मध्य प्रदेश) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी पती भूपेंद्र यादव (वय ३०), सासरे मुलायमसिंग (वय ५२), सासू राजकुमारी (वय ५०, सर्व रा. मध्य प्रदेश) आणि मित्र शिरीष शहा (वय ३३, रा. मांजरी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मानसीचे वडील संदीप फुलसिंग यादव (वय ५०, रा. उत्तर प्रदेश) यांनी या संदर्भात चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मानसी पुण्यात उच्चशिक्षणासाठी आली होती. पुण्यात वास्तव्यास आल्यानंतर तिची जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या शिरीष शहा याच्याशी ओळख झाली. दोघेजण एकत्रच राहत होते.

दरम्यान, पती, सासू, सासऱ्यांनी मानसीला घटस्फोट देण्यास सांगितले. आरोपी शहा याने मानसीकडे विवाहाची मागणी करीत तगादा लावला होता. त्याने तिच्याकडे पैशांचीही मागणी केली होती. आरोपींनी केलेल्या छळामुळे मानसीने ५ एप्रिल रोजी चंदननगर भागात नदीपात्रात उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला. तिला नागरिकांनी पाण्यातून बाहेर काढले. तिची समजूत काढण्यात आली. त्यानंतर रात्री मानसीने रात्री साडेआठच्या सुमारास दहाव्या मजल्यावर असलेल्या बाल्कनीतून उडी मारून आत्महत्या केली. मानसीच्या वडिलांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. छळामुळे तिने आत्महत्या केल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे. सहायक पोलीस निरीक्षक मनोहर सोनवणे तपास करत आहेत.

## वैभववाडीत पोलीस कर्मचाऱ्यावर चाकू हल्ला; आरोपीचं मानसिक संतुलन अस्थिर



सिंधुदुर्ग जिल्ह्यात पोलिसांवरच चाकूहल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या चाकू हल्ल्यात पोलीस कर्मचारी रमेश नारनवर हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्या पाठीवर चाकूचे दोन वार करण्यात आले आहेत. दरम्यान या संदर्भात पोलिसांनी संशयित आरोपी राजबुल अंकुश देवकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. आरोपीवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. संशयित आरोपीचे मानसिक संतुलन बिघडल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आलं आहे. सिंधुदुर्गातील ही धक्कादायक घटना काल रात्री 9 वाजण्याच्या सुमारास वैभववाडी तालुक्यात कोकिसरे नारकरवाडी येथे घडली. संशयित आरोपीचे काल आई-वडिलांसोबत भांडण झालं होतं. यातून पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला. संशयित आरोपी हा दोन्ही हातात चाकू घेऊन फिरत होता. त्यानंतर पोलीस कर्मचारी रमेश नारनवर हे पकडण्यासाठी पुढे गेले. मानसिक संतुलन बिघडलेलं असल्यानं संशयित आरोपीला अधिक उपचारासाठी दाखल करण्याचा प्रयत्न नारनवर यांनी केला. दरम्यान, संशयित आरोपीनं नारनवर यांच्या पाठीवर सपासप वार केले. यात ते गंभीर जखमी झाले आहेत. तर याच संशयित आरोपीनं आपल्या वडिलांना देखील मारहाण केल्याची बाब समोर आली आहे. या संपूर्ण प्रकरणी संशयित आरोपीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार व पोलीस कर्मचारी नारनवर यांच्यावर केलेल्या हल्ल्या प्रकरणी पोलीस कर्मचारी कृष्णात पडवळ यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार आरोपीच्या विरोधात वैभववाडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## यवतमाळमध्ये 28 लाखांचे कपाशीचे बोगस बीटी बियाणे जप्त, दोघांना अटक



यवतमाळमधील पांढरकवडा तालुक्यातील मराठवाकडी गावा जवळ 28 लाख 52 हजारांचे कपाशीचे बोगस बीटी बियाणे जप्त करण्यात आले आहे. पांढरकवडा पोलीस पेट्रोलिंग करत असताना संशयितरीत्या उभा असलेल्या वाहनाची तपासणी केल्यानंतर हे बोगस बीटी बियाणे आढळून आले. ही कारवाई आज सकाळी बारा वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

पांढरकवडा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक हेमराज कोळी आणि त्यांचे पथक रस्त्यावर पेट्रोलिंग करत होते. यावेळी एका जीपमध्ये (क्रमांक KA, 40 A 9994) रिकामी कॅरेट असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. कॅरेट तर रिकामी होती, परंतु, वाहनांच्या चाकावर प्रेशर असल्याचे लक्षात आल्यामुळे पोलिसांचा संशय बळावला. त्यामुळे पोलिसांनी तपासणी केली असता रिकाम्या कॅरेट खाली बोगस बियाण्याच्या बोरी आढळून आल्या.

## रेती घाटात आढळला संशयास्पद मृतदेह, नांदेडमधील बिलोली तालुक्यातील घटनेने खळबळ

नांदेडमधील बिलोली तालुक्यातील सगरोळी येथील मांजरा नदी पात्रात काल एका पुरूषाचा (वय 35) संशयास्पद मृतदेह आढळला आहे. रेती उत्खनन केलेल्या नदी पात्राच्या पाण्यात हा मृतदेह आढळून आला आहे. बिलोली पोलिसांना याबाबत माहिती मिळयानंतर पोलीस निरीक्षक डोईफोडे यांनी रेती घाटात आढळून आलेल्या मृतदेहाचा पंचनामा केला. आरोग्य विभागामार्फत त्याच ठिकाणी शवविच्छेदन केले. त्यानंतर सगरोळी ग्रामपंचायतीच्या मदतीने



या मृतदेहाचा कुठलीही ओळख न पटवताच स्मशानभूमीत दोन ते तीन तासात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यामुळे या घटने विषयी पोलिसांच्या सारवासारव करण्यावर नांदेड जिल्ह्यातून तर्कवितर्क काढले जात आहेत.

बिलोली तालुक्यातील सगरोळी येथे सुरू झालेला रेती धक्का हा ठेकेदार आयुब मचकुरी यांचा असून, हा रेती घाट सुरू झाल्यापासून नेहमी या ना त्या कारणामुळे चर्चेत राहिला आहे. तसेच पत्रकारांवर व बजरंग दलच्या कार्यकर्त्यांवर गावकऱ्यांच्या मदतीने केलेला हल्ल्याच्या अनेक घटना ताज्या असताना आज पुन्हा त्याच ठेकेदाराच्या घाटात अनोळखी मृतदेह सापडल्याने आणि त्या मृतदेहाचा अंत्यविधी पोलिसांनी घाईगडबडीत केल्यामुळे पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आत आहे.

## संपादकीय...



# पेगॅसस वगैरे मुद्दे गेले कुठे?

पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर महिनाभरातील दिल्लीमध्ये एकमेव लक्ष्यवेधी घटना घडली ती म्हणजे शरद पवार आणि मोदी यांची भेट. ही घटनाही संसदेच्या सभागृहांच्या बाहेर झाली, त्याचा अर्थसंकल्पीय अधिवेशनाशी काहीही संबंध नव्हता. राज्याच्या दृष्टीने बघायचे तर, सर्वपक्षीय आमदारांचा प्रशिक्षणाच्या निमित्ताने दिल्लीदौरा झाल्यामुळे उगाचच पळापळ झालेली दिसली, त्यातून निघाले काहीच नाही. शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्या मालमत्तांवर सक्तवसुली संचालनालयाने टाच आणल्यामुळे थोडी रंगत आली. अन्यथा शरद पवारांनी बोलावलेले स्नेहभोजन पुणेरी मिसळीसारखे मिळमिळीत झाले असते. महिनाभराच्या संसदेच्या अर्थसंकल्पीय रटाळ कामकाजात राज्यातील राजकीय घडामोड विरंगुळा ठरला. हे अधिवेशन नियोजित



कालावधीपेक्षा दोन दिवस आधी संपवले गेले, त्यातूनच सभागृहांमध्ये काय चाललेले होते याचा अंदाज यावा!

केंद्र सरकारसाठी वित्त विधेयकाव्यतिरिक्त दोन विधेयके महत्त्वाची होती, दिल्ली महापालिकांचे विलीनीकरण आणि फौजदारी ओळख दुरुस्ती विधेयक. बहुमतामुळे कुठलीही विधेयके लोकसभेत मंजूर होण्यात भाजपला अडचण नसते. राज्यसभेत भाजपकडे अजूनही बहुमत नाही, पण वरिष्ठ सभागृहात भाजपविरोधात अटीतटीने होत असलेला संघर्ष आता वेगाने कमी होत असल्याचे दिसले. राज्यसभेत काँग्रेसची ताकद जेमतेम उरलेली आहे, विखुरलेल्या विरोधकांमुळे राज्यसभेत विधेयक संमत करून घेणे भाजपला कठीण जात नाही. वादग्रस्त कृषी विधेयकांना झालेला तीव्र विरोध हा राज्यसभेतील विरोधकांकडून झालेला अलीकडच्या काळातील अखेरचा संघर्ष होता असे म्हणता येते. केंद्रासाठी महत्त्वाची असलेली दोन विधेयके संमत झाल्यावर अधिवेशनाचे कामकाज सुरू ठेवण्यात कोणालाही फारशी रुची नव्हती. अनेकांना दिल्लीच्या काहिलीतून कधी एकदा निघून जातो असे झालेले असते. त्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशन ४८ तास आधी संपुष्टात आले, हे सदस्यांच्या पथ्यावरच पडले. या अधिवेशनात गेल्या वेळचे विषय कुठे गायब झाले हे कळले नाही. ‘पेगॅसस’च्या आधारे देशांतर्गत हेरगिरीचा मुद्दा काँग्रेसने चव्हाटय़ावर आणला होता. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या भागामध्ये त्याची थोडी फार चर्चा झाली होती, पण नंतर काँग्रेसला ‘पेगॅसस’’चा विसर पडला असावा. अगदी शून्य प्रहरातदेखील कोणीही ‘पेगॅसस’चा उल्लेख केला नाही. विधानसभेच्या निवडणुका होईपर्यंत शेतकऱ्यांचे प्रश्न विरोधकांना आकर्षित करत होते, पण निवडणुकांच्या निकालांनी शेतीप्रश्न ‘निष्प्रभ’ केल्यामुळे या विषयालाही आता कोणी हात लावत नाहीत. पंजाबच्या मतदारांनी ‘आप’कडे सत्ता दिली आणि पश्चिम उत्तर प्रदेशच्या जाटांनी यादवांच्या ‘सप’ला दूर केले. त्यामुळे विरोधकांकडे शेतीच्या मुद्दय़ावर बोलायला कोणी उरले नाही. करोनाची तिसरी लाट तुलनेत कमी त्रासदायक होती. सुदैवाने रुग्णमृत्यूंची संख्या कमी होती. लसीकरणाची व्याप्ती वाढली, इतकेच नव्हे तर दिल्लीसारख्या महानगरामध्ये मुखपट्टीची सक्तीही संपली. करोनाच्या मुद्दय़ातही चर्चा करण्याजोगे काही राहिले नाही. चर्चेसाठी एकमेव विषय होता इंधन दरवाढीचा. लोकसभेच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत केंद्र सरकारने महागाईवर चर्चा करण्याच्या शक्यतेवर विचार करण्याचे आश्वासन दिले होते, पण अधिवेशन संपेपर्यंत केंद्राला महागाईचा चटका बसलेला दिसला नाही. लोकसभेत अखेपर्यंत इंधन दरवाढीवर केंद्राने चर्चा होऊ दिली नाही. या मुद्दय़ाला धरून एक-दोन दिवस सकाळच्या सत्रात दोन्ही सभागृहांमध्ये तहकुबी झाल्या, पण विरोधकांचा हा क्षीण विरोध विरून गेला. राज्यसभेत सभापती व्यंकय्या नायडू यांनी स्पष्ट केले होते की, सदस्यांनी कितीही नोटिसा दिल्या तरी या विषयावर स्वतंत्र चर्चा होणार नाही.

# लघुदृष्टी उच्च शिक्षणाची

गेल्या कही वर्षांमध्ये शालेय स्तरापासून उच्च शिक्षणापर्यंत सातत्याने वेगवेगळे बदल होत आहेत. पण ते बेरोजगारांचे तांडे कमी करू शकणारे नाहीत, की शिक्षण घेणाऱ्याला आणि समाजाला मुलभूत असे काही देऊ करणारे नाहीत. सरकार शिक्षणावर भरमसाठ खर्च करते, शिक्षणसंस्था चालतात आणि विद्यार्थ्यांना पदव्यांच्या भेंडोळ्या मिळतात, पण त्यांतून उपजीविकेसाठीचे त्यांचे कौशल्य विकसित होते का? पाण्यापासून एसटी संपापर्यंत समाजाचे अनेक प्रश्न सोडवण्यासाठी त्या शिक्षणाचा उपयोग होतो का? कोण सोडवणार हा तिढा आणि कसा?

गुजरात आणि कर्नाटक ही दोन राज्ये भगवद्गीता शालेय अभ्यासक्रमात आणणार आहेत, असे वाचनात आले. त्यामुळे आजच्या शिक्षण पद्धतीतील काही विशेष गुणांना आध्यात्मिक व सांस्कृतिक वलय निश्चितच प्राप्त होईल. कुठल्याही फळाची अपेक्षा न ठेवता नेमलेले कार्य करत राहणे – म्हणजेच कर्म आणि निष्पत्ती यामध्ये जी तफावत आपल्या समाजात दिसून येत आहे, ती लोकांमध्ये अजून घट्टपणे रुजेल. विद्यार्थी, शिक्षणाची अपेक्षा न ठेवता महाविद्यालयाचे शुल्क भरत राहतील, आणि पदव्यांचे कागदी तुकडे जमा करत राहतील. आजूबाजूच्या वास्तव परिस्थितीकडे आणि आजच्या समस्यांकडे दुर्लक्ष करून आपले तज्ज्ञ जागतिक अभ्यासक्रम रेटत राहतील, व आपले शिक्षक नेमलेल्या क्रिया पार पाडत राहतील. आपले शासन व त्यातील उच्चपदस्थ, मंत्री, सचिव इत्यादी हे फलनिष्पत्तीचे कुठलेही मूल्यमापन न करता शिक्षकांना पगार व कॉलेजांना अनुदान देत राहतील.

तरुण पिढीसाठी मात्र अशा पद्धतीच्या उच्च शिक्षण व्यवस्थेचे परिणाम फारच वाईट आहेत. केंद्र शासनामार्फत प्रकाशित झालेल्या पीरियडिक लेबर फोर्स सर्व्हे (ढछार) मध्ये बेरोजगारीची (सन २०१७-१८ : अंदाजित) देण्यात आलेली माहिती खाली दाखवली आहे. ही कोविडच्या आधीची आहे. त्यानंतरची माहिती अद्याप उपलब्ध नाही. पण ती यापेक्षा फार वेगळी नसणार.



या आकडेवारीवरून स्पष्ट होते की आजच्या आपल्या तरुण पिढीमध्ये बेरोजगारीचा प्रश्न गंभीर आहे. भारतात २१ टक्के तर महाराष्ट्रात १८ टक्के युवकांना नोकरी तर सोडाच, रोजगारदेखील नाही. भारतात तब्बल ४५ टक्के आणि महाराष्ट्रात ३० टक्के पदवीधर हे बेरोजगार आहेत. ही समस्या काही दशकांपासून दिसून येत आहे आणि ती अधिकाधिक तीव्र होत आहे. यामुळे उच्च शिक्षणाची विद्यार्थ्यांसाठी नेमकी फलनिष्पत्ती काय व समाज व अर्थव्यवस्थेत उच्च शिक्षण विभागाचे नेमके कार्य काय हे प्रश्न आपण विचारायला हवे.

याचे विश्लेषण केल्यास त्यात तीन मुद्दे दिसून येतात. पहिला मुद्दा, पदवीधर या संबोधनाचा नेमका अर्थ काय? नेमक्या काय क्षमता किंवा कुशलता पदवीधराकडून अपेक्षित आहे? दुसरा मुद्दा, जे प्रशिक्षण दिले जाते ते या अपेक्षांना पोषक आहे का? तिसरा मुद्दा, शिक्षण प्रणालीचे मूल्यमापन व विश्लेषण, व त्यामध्ये योग्य परिवर्तन होत आहे का? खरे तर, हे प्रश्न आपल्या विद्यापीठांनी हाती घ्यायला हवेत. असे विश्लेषण त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करायला हवे. पण तसे काही दिसत नाही. विद्यापीठांकडून ते होत नसल्यास आपले मंत्री किंवा सचिवांनी त्याबद्दल योग्य सूचना द्यायला हव्यात. तसे झाल्यास, विद्यापीठांमध्ये असा अभ्यास करण्यासाठीची कुवत, इच्छाशक्ती, त्यासाठी लागणारा सामाजिक दृष्टिकोन आणि बांधिलकी पुन्हा निर्माण होईल.

बाहेरच्या जगामध्ये पदवीधराच्या क्षमता व कौशल्य याबाबत पुढील प्रकारे विचार केला जातो. आजचे वास्तव आणि प्रश्न यांची त्याला असलेली जाणीव, परिस्थितीचे विश्लेषण करण्याची त्याची क्षमता, माहिती गोळा करून त्याची योग्य मांडणी करण्याची कुवत, अहवालवाचन व लेखनक्षमता, कुठल्याही विषयाबद्दल उपलब्ध स्रोत, प्राथमिक माहिती आणि आपले अनुभव यावरून योग्य ते निष्कर्ष काढण्याची क्षमता. पदवीधराकडून या महत्त्वपूर्ण क्षमता अपेक्षित आहेत. याशिवाय आपल्या विषयाबद्दल आधुनिक माहिती, त्यातील महत्त्वाच्या वैज्ञानिक प्रक्रियांमध्ये कुशलता, विषयाशी संबंधित व्यवसाय व समाज, प्रशासन व अर्थव्यवस्थेत त्याचे स्थान याची माहिती असणे हे अपेक्षित आहे.केंद्राच्या नवीन शिक्षण धोरणात याबद्दल काही प्रमाणात विचार केल्याचे दिसते. पण त्याच्या अंमलबजावणीसाठी कुठलेही पाऊल उचललेले दिसत नाही. मुळातच केंद्राच्या कार्यपद्धतीत वास्तवाबद्दल आस्था सापडत नाही. घटनेप्रमाणे उच्च शिक्षणाचा दर्जा राखण्याची जबाबदारी ही केंद्राने स्वत:कडे ठेवली आहे. याची अंमलबजावणी केंद्राचा विद्यापीठ अनुदान आयोग आणि तत्सम संस्थांकडे आहे. मात्र याबाबत केंद्राच्या बाबू व तज्ज्ञ मंडळींकडून कुठलाही अभ्यास किंवा अहवाल प्रसिद्ध झालेला नाही. रसायनशास्त्रात पदवीचा नेमका अर्थ काय? किती स्थानिक व प्रादेशिक उद्योग किंवा प्रशासकीय प्रक्रियांमध्ये त्यांना स्थान आहे? गावाच्या पाण्याच्या दर्जाबद्दल सर्वेक्षण आणि अहवाल किंवा इतर असे अहवाल त्यांना तयार करता यावे असे काही त्यात नमूद केलेले नाही. अर्थशास्त्रातील पदवीधराला जिल्ह्याचा किंवा शहराचा वार्षिक अहवाल समजून घेणे, व प्रशासनात अर्थशास्त्राचे महत्त्व हे समजणे – हे अपेक्षित आहे, असेही त्यात दिलेले नाही. याउलट या संस्थांद्वारे ‘एक राष्ट्र एक अभ्यासक्रम’ अशा भोंगळ घोषणांद्वारे शिक्षणाचे केंद्रीकरण होत आहे. शिक्षक निवड व बढती हे विद्यार्थ्यांना शिकवणे, विषयाची स्थानिक व प्रादेशिक प्रश्नांशी सांगड घालणे, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्याकडून चांगले अभ्यास घडवून आणणे असे निकष बाजूला राहून, पेट-सेट या स्पर्धा पद्धतीच्या परीक्षा, व पीएचडी आणि शोधनिबंध असे ‘राष्ट्रीय’ निकष रेटले जात आहेत.

यामुळे पदवी अभ्यासक्रम, शिकवण्याची पद्धत आणि विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन आणि मूल्यमापन हे अतिशय ढोबळ राहिले आहे. अनुदान मात्र वाढत चालले आहे. महाराष्ट्रात प्रत्येक पदवी विद्यार्थ्यांमागे शासनातर्फे रु. ३०-५० हजार अनुदान विद्यापीठांमार्फत कॉलेजांना दिले जाते. म्हणजेच, तालुका ठिकाणी, जिथे एक हजार विद्यार्थी आहेत, अशा महाविद्यालयाला चार ते पाच कोटी रुपयांचे अनुदान मिळते. ४०-५० शिक्षकांचा पगार त्यातून होतो. ज्ञान-विज्ञान व अभ्यास, व त्याला लागणारी शिस्त व वास्तवाशी प्रामाणिकपणा हे महत्त्वाचे गुण विद्यार्थ्यांमध्ये सोडाच, शिक्षकांमध्येदेखील क्वचितच आढळून येतात. अशा महाविद्यालायाचे स्थानिक योगदान रक्तदान शिबीर, कोविडकाळात पीपीई किटचे वाटप, इतपतच मर्यादित असते. गावांची पाण्याची व्यवस्था, स्थानिक परिवहन असे कुठलेही विषय हाताळायची यांच्यामध्ये कुवत किंवा धमक नसते.

इतर देशांमध्ये, आपल्या शहरात महाविद्यालय किंवा विद्यापीठ असणे हे तिथल्या प्रशासनाला व नागरिकांना अतिशय उपयोगी असते. त्या शहराचे नियोजन व त्याला लागणारे स्थानिक संशोधन यामध्ये विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे महत्त्वपूर्ण योगदान असते. हा अनुभव विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आणि पुढच्या व्यावसायिक प्रवासासाठी निर्णायक असतो.

खरे तर हे प्रश्न आपल्या सामान्य नागरिकालासुद्धा पडले पाहिजेत. आजच्या समस्या – प्रदूषण, खिळखिळी झालेली नागरी व्यवस्था, तोटय़ात गेलेली व बंद पडलेली एस.टी., छोटे उद्योग यांची पीछेहाट, पाण्याचा प्रश्न, शेतीची दुरावस्था – हे फार गंभीर आहेत व त्याला अभ्यास, नियोजन, नवीन कायदे, त्यांची अंमलबजावणी व विश्लेषण – हे चक्र सतत सुरू राहिले पाहिजे. चांगल्या नोकऱ्यांच्या निर्मितीसाठी विकासाच्या प्रश्नांचे व्यावसायीकरण हा एकमेव मार्ग आहे. पण असे होताना दिसत नाही.विद्यार्थ्यांनीसुद्धा लक्षात घेतले पाहिजे की आपल्या शिक्षणाच्या नावाखाली आपले राज्य सरकार अंदाजे दहा हजार कोटी रुपये तर केंद्र सरकार ५० हजार कोटी रुपये खर्च करत आहे.

# उसने घेतलेले पैसे मागण्यासाठी गेलेल्या महिलेची हत्या, कल्याण पूर्वेतील धक्कादायक घटना




उसने घेतलेले पैसे मागण्यासाठी गेलेल्या महिलेची आई आणि मुलाने हत्या केल्याची धक्कादायक घटना कल्याण पूर्वेत घडली आहे. रंजना जैस्वार असे हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी आई लालसादेवी राजभर आणि मुलगा विजय राजभर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून दोघांनाही अटक केली आहे.


रंजना यांची हत्या केल्यानंतर लालसादेवी आणि विजय दोघे घराला कुलूप लावून निघून गेले होते. मात्र, आज सकाळी विजय राजभर याने आधारवाडी जेलमध्ये जावून तेथे त्याने केलेले कृत्याबाबत माहिती दिली.तेथून त्याला कोलशेवाडी पोलीस ठाण्यात पाठवण्यात आले. कोलशेवाडी पोलीस ठाण्यात त्याने हत्या केल्याची कबुली दिली.

कल्याण पूर्व चक्की नाका परिसरात रंजना जैस्वार ही महिला आपल्या कुटुंबासह राहत होती. रंजना हिचा ब्युटी पार्लरचा व्यवसाय होता. तिची याच परिसरात राहणाऱ्या अजय राजभर सोबत मैत्री होती. रंजनाने अजयला काही पैसे उसनवार दिले होते. पैसे घेऊन बराच कालावधी झाला, मात्र अजय पैसे देण्यास टाळाटाळ करत होता. त्यामुळे रंजना ही अजयच्या घरी जाऊन पैसे मागत होती. त्यामुळे अजयच्या कुटुंबीयांसोबत तिचे वाद होत होते.

काल रात्री दहा वाजण्याच्या सुमारास रंजना अजयच्या घरी गेली. त्यावेळी अजय घरी नव्हता, तिने विजय आणि अजयची आई लालसा देवी यांच्याकडे पैशांची मागणी केली. यातून या तिघांमध्ये वाद झाला. संतापलेल्या विजय आणि त्याच्या आईने रंजनावर चाकूने वार करत तिची हत्या केली. हत्या केल्यानंतर विजय आणि लालसा देवी घराला बाहेरून कुलूप लावून तेथून निघून गेले. विजय सकाळी आधारवाडी जेल येथे गेला आणि पोलिसांना त्यांने केलेल कृत्य सांगत स्वत:ला अटक करण्याची मागणी केली.

आधारवाडी जेलमधून विजय कोळशेवाडी पोलीस ठाण्यात आला. तेथे त्याने घडलेल्या घटनेबाबत पोलिसांना माहिती देत हत्या केल्याची कबुली दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून घडलेल्या घटनेचा पंचनामा केला. त्यानंतर विजयला ताब्यात घेत दोघांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. कोलशेवाडी पोलीस या प्रकरणी पुढील तपास करत आहेत.

# भिवंडीत बंटी बबलीकडून मैत्रिणीचा विश्वासघात; पाहुणी म्हणून येऊन केलं असं काम



एका महिलेची मैत्रीण असलेल्या 'बंटी बबली'नं आपल्या मैत्रिणीचाच विश्वासघात केल्याचं समोर आलं आहे. घरात ठेवलेले 6 लाख 83 हजार रुपयांचे 42 तोळे सोने व 90 हजार रोख असा 7 लाख 73 हजार रुपयांची चोरी करून पळून गेलेल्या बबलीला नारपोली पोलीसांनी गोवा येथून ताब्यात घेतले आहे. मोनालीशा पंकज रॉय असं अटक केलेल्या बबलीचे नाव असून तिचा लिव्ह इन रिलेशनमध्ये राहणारा पार्टनर प्रेमचंद भारती फरार आहे.कशेळी येथील एका इमारतीमध्ये दिशा रवींद्र लखाणी या वास्तव्यास असून त्यांची मैत्रीण मोनालीशा पंकज रॉय व तिचा पती बनून आलेला प्रेमचंद भारती हे फ्लॅट भाड्याने घेण्यासाठी येऊन पाच दिवस तिच्यासोबत तिच्याच फ्लॅटमध्ये राहिले. त्या दरम्यान एका रात्री चौघांनी पार्टी करून मद्यसेवन केले असता त्याचा फायदा घेत बंटी बबली यांनी दिशा लखाणी यांच्या कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेली रोख रक्कम व सोन्याचे दागिने चोरी करून दोघांनी दुसऱ्या दिवशी तिथून पळ काढला. दुसऱ्या दिवशी चोरी झाल्याचे महिलेच्या लक्षात आल्यावर तिनं नारपोली पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली. नारपोली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मदन बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक माहितीच्या आधारे तपास केला असता आरोपी हे गोवा येथे असल्याचे निष्पन्न झाले.पोलीस पथकाने तात्काळ तिथे जात महिला आरोपी मोनालीशा पंकज रॉय हिला मरोर, सालीगाव गोवा येथून ताब्यात घेतले. तिच्या जवळून 26 तोळे सोन्याचे दागिने जप्त करण्यात यश मिळवले असून नारपोली पोलीस फरार आरोपी प्रेमचंद भारती याचा शोध घेत आहे. महिला आरोपीस 9 एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे.

# धक्कादायक! कुटुंबावर 20 जणांच्या टोळक्याचा हल्ला




परप्रांतिय या ठिकाणी राहू शकत नाही, असं म्हणत 20 जणांच्या टोळक्यानं एका कुटुंबावर हल्ला केल्याची धक्कादायक रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील देगाव येथे घडली आहे. शनिवारी दुपारी 2 वाजता जवळपास 20 जणांचं टोळक्यानं हा हल्ला अचानकपणे केला. या घटनेबाबत दापोली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल झाली असून 20 अज्ञातांविरोधात गुन्हा देखील दाखल झाला आहे.

या हल्ल्यात घराचं पूर्णत: नुकसान झालं आहे. जवळपास 4 लाखांची रोकड यावेळी गायब झाल्याचा दावा देखील गंगासागर शुक्ला यांनी केला आहे. यावेळी घरातील कपडे, गृहोपयोगी सामान, अन्नधान्याचं देखील नुकसान झालं आहे. मी परप्रांतिय असल्यानं संपूर्ण गावानं हल्ला केल्याचा गंभीर आरोप शुक्ला यांनी 'एबीपी माझा'कडे बोलताना केला आहे. दरम्यान, या घटनेचा सर्वच स्तरातून निषेध केला जात आहे. पोलिस या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत.

**कशी घडली घटना?**

मुळचे उत्तर प्रदेशचे असलेले गंगासागर शुक्ला यांनी देगावपासून जवळचं असलेल्या सीतेचा माळ इथं वर्षभरापूर्वी 14 गुंठे जागा विकत घेतली आहे. ते काजूचा व्यवसाय करतात आणि आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करतात. विकत घेतलेल्या जागेवर घर बांधण्याचा त्यांचा मानस होता. त्याप्रकारची तयारी देखील त्यांनी केली होती. पण शनिवारी दुपारी अचानकपणे मोठ्या संख्येनं लोकांनी माझ्या घरावर हल्ला केला. 'तू परप्रांतिय आहेस. तुला इथं राहता येणार नाही', अशा प्रकारची धमकी देत शिवीगाळ देखील केल्याचा आरोप गंगासागर शुक्ला यांचा आहे. माझा संसार पूर्णपणे उद्धवस्त झाला आहे. माझ्या घरातील जवळपास 4 लाखांची रोकड गायब असून 400 किली काजू बी देखील यामध्ये उद्धवस्त झाल्याचा आरोप शुक्ला यांना एबीपी माझाकडे बोलताना केला आहे. सध्या घरात कपडे, गृहोपयोगी सामान शिल्लक नाही. ज्यावेळी हल्ला झाल्या त्यावेळी मी आणि माझ्या पत्नीनं घटनास्थळावर पळ काढला म्हणून वाचलो. हल्लेखोर आम्हाला शोधत होते. पण, आम्ही सापडलो नाही. मुलगी शाळेत होती. अचानकपणे मोठ्या संख्येनं दुपारच्या वेळी टोळक्यानं हल्ला केला असा घटनाक्रम गंगासागर शुक्ला यांनी सांगितला. मला सतत धमक्या येत असून माझ्या जीवाला धोका आहे, असं देखील शुक्ला यांचं म्हणणं आहे. दरम्यान, आता किमान आम्हाला न्याय हवा अशी मागणी शुक्ला यांनी केली आहे.

# पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार १२ ते १८ एप्रिल - २०२२






मीरा भाईंदर महानगर पालिका प्रभाग क्रमांक 4 च्या सभापतीपदी सौ रूपाली शिंदे (मोदी) यांची निवड झाल्याबद्दल पोलीस बातमी पत्र च्या वतीने त्यांचे हार्दिक स्वागत केले. सदर प्रसंगी पोलीस बातमी चे संपादक दीपक मोरेश्वर नाईक,त्रंबकेश्वर च्या समाजसेविका स्वाती विजय थेटे, रुपेश विजय थेटे, पुरोहित त्रंबकेश्वर व सौ संगीता जोशी देशपांडे उपस्थित होते.

## फोन टॅपिंग प्रकरणात एकनाथ खडसे यांचा गौप्यस्फोट



मुंबई : फोन टॅपिंग प्रकरणी आताच्या घडीची मोठी बातमी. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी फोन टॅपिंग प्रकरणी मोठा गौप्यस्फोट केला आहे. खडसे यांचा फोन 67 दिवस टॅप तर शिवसेना नेते संजय राऊत यांचा फोन 60 दिवस टॅप केल्याची माहिती खडसे यांनी दिली आहे. दरम्यान, नाव न घेता खडसे यांनी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे.

सत्तासंघर्षाच्या काळात हा सगळा प्रकार हंगामी मुख्यमंत्र्यांनी केल्याचा आरोप खडसे यांनी 'झी 24 तास'शी बोलताना केला. त्यामुळे खडसे यांनी पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीसांवर नाव न घेता निशाणा साधला आहे. खडेस यांनी यावेळी सांगितले की, माझा फोन तब्बल 67 दिवस टॅपिंगवर होता. तर संजय राऊत यांचाही फोन 60 दिवस टॅपिंगवर होता. ही सगळी माहिती खडसे यांची फोन टॅपिंगप्रकरणी जबाबात दिली आहे. रश्मी शुक्ला यांच्याकडून फोन टॅपिंग करण्यात आले होते. त्यानंतर ही चौकशी पोलिसांकडून करण्यात येत आहे. दोन वेळा रश्मी शुक्ला यांची चौकशी करण्यात आली आहे.

याआधी संजय राऊत यांची चौकशी झाली होती. आता खडसे यांचीही चौकशी झाली. फोन टॅपिंग (Phone Tapping Case) प्रकरणात संजय राऊतांचा (MP Sanjay Raut यांचा मुंबई पोलिसांना जबाब नोंदवला.

## 'छळ मांडण्याच्या दृष्टीने सरकारच्या दबावाखाली पोलिसांकडून चौकशी', प्रवीण दरेकरांचा गंभीर आरोप

विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांची मुंबई बँक (Mumbai Bank) बोगस मजूर प्रकरणात आज दुसऱ्यांदा पोलीस चौकशी झाली. दरेकर यांची सुमारे चार तास चौकशी करण्यात आली. चौकशीनंतर प्रवीण दरेकर यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे. छळवाद मांडण्याच्या दृष्टीने सरकारच्या दबावाखाली पोलिसांकडून चौकशी करण्यात आली, असा गंभीर आरोप प्रवीण दरेकर यांनी केला आहे. आमच्यावर कार्यकर्ता म्हणून कायद्याचे पालन करण्याचे संस्कार असल्यामुले आम्ही पहिल्या दिवसापासून पोलीस तपासात सहकार्याची भूमिका घेतली आहे. पहिल्या दिवशी चार तास चौकशी झाली. आजही तीन-चार चौकशी झाली.' यानंतरही गरज पडल्यास चौकशीसाठी हजेरी लावणार असल्याचं दरेकरांनी म्हटलं आहे.

दरम्यान, पोलीस कस्टडीची मागणी कशासाठी असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे. यामागचा केवळ उद्देश हा खोटी एफआयआर दाखल करुन छळवाद मांडण्याचा आहे, असा आरोपही त्यांनी केला आहे. यावेळी दरेकर यांनी शिवसेना खासदार संजया राऊत यांच्यावर निशाणा साधलाय. 'आम्ही संजय राऊतांसारखा आक्रस्थळेपणा करणार नाही', असं म्हणत दरेकर यांनी म्हटलं आहे. दरम्यान, आपण अब्रुनुकसानीचा दावा करणार




असल्याचंही प्रवीण दरेकर यांनी सांगितलं आहे. दरेकरांनी सांगितलं की, "'विरोधकांनी एकत्रितपणे हातमिळवणी करून केलेलं हे षड्यंत्र आहे. मी नाना पटोले, भाई जगताप आणि धनंजय शिंदे यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार आहे. या संदर्भातील पत्र त्या तिघांनाही पाठवणार आहे. कारण मुंबई बँकेचा नफा 15 कोटी असून आणि दोन हजार कोटींच्या घोटाळ्याचा आरोप करण्यात येत आहे. आपल्या प्रसिद्धीसाठी एखाद्याची बदनामी करणं योग्य नाही."

यापूर्वीच्या चौकशीत काय झालं? 4 एप्रिल रोजी मुंबईतील माता रमाबाई आंबेडकर पोलीस स्टेशनमध्ये त्यांची तीन तास चौकशी करण्यात आली होती. दुपारी 12 वाजता सुरु झालेली चौकशी दुपारी 3 वाजता संपली. "पोलिसांनी पाहिजे असलेली सगळी माहिती दिली. पण पोलिसांवर सरकारचा प्रचंड दबाव असल्याचं प्रत्येक क्षणी जाणवत होतं," अशी प्रतिक्रिया प्रवीण दरेकर यांनी चौकशीनंतर माध्यमांशी संवाद साधताना दिली. तसंच पोलिसांनी अनेक वेळा उलटसुलट आणि तेच तेच प्रश्न विचारुन भंडावून सोडण्याचा प्रयत्न केला. शिवाय चौकशी सुरु असताना पोलीस अधिकाऱ्यांना सहा-सात वेळा फोन आले, पण कोणाचे फोन आले ते कळलं नाही, असंही दरेकर यांनी म्हटलं होतं.

प्रवीण दरेकर यांची मुंबै बँकेवर संचालक म्हणून बिनविरोध निवड झाली होती. मुंबै बँकेच्या निवडणुकीत प्रवीण दरेकर मजूर आणि नागरी सहकार बँक अशा दोन्ही प्रवर्गातून निवडून आले होते. परंतु सहकार विभागाने प्रवीण दरेकर यांना मजूर म्हणून अपात्र ठरवलं. दरेकर 1997 पासून मुंबै बँकेवर मजूर प्रवर्गातून संचालक म्हणून निवडून येत आहेत.

पण मजूर नसतानाही निवडणूक लढवून प्रवीण दरेकर यांनी बँकेच्या हजारो ठेवीदारांची आणि सरकारची फसवणूक केल्याचा आरोप करत आम आदमी पक्षाचे धनंजय शिंदे यांनी त्यांच्याविरोधात तक्रार नोंदवली. मुंबै बँकेत कोट्यवधीचा घोटाळा झाला असून सहकार कायद्याचं उल्लंघन केल्याचा आरोप दरेकर यांच्यावर आहे.

## धक्कादायक!

### अभ्यासिकेत जाणाऱ्या तरुणीचा दिवसाढवळ्या विनयभंग



महिलांवरील अत्याचाराच्या अनेक घटना आपण रोज ऐकतो, वाचतो. अशीच एक धक्कादायक घटना पुण्यात घडली आहे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारी एक तरुणी अभ्यासिकेत जाताना एका अज्ञात इसमानं तिचा विनयभंग केल्याचं उघडकीस आलं आहे. तरुणी अभ्यासिकेत जात असताना आरोपीनं रस्त्यात तिला गाठलं आणि तिच्यासमोर अश्लील चाळे करण्यास सुरुवात केली. ही घटना 10 जानेवारी रोजी घडली असून 25 वर्षीय तरुणीनं याप्रकरणी पुण्यातील विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## अॅड. गुणरत्न सदावर्ते यांच्या घराची झाडाझडती, आज बेल की जेलचा फैसला?

मुंबई : Gunaratna Sadavarte: एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाला वेगळेच वळण लागले. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानंतर काही एसटी कर्मचाऱ्यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक या घरावर हल्ला चढवला. त्यानंतर जवळपास 100 लोकांना आणि चिथावणी दिल्याप्रकरणी अॅड. गुणरत्न सदावर्ते यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला. त्यानंतर 7-8तासांपासून पुरावे गोळा करण्याचे काम पोलिसांकडून सुरु आहे. मुंबई पोलिसांकडून सीसीटीव्ही, रजिस्टर तपासणी सुरु आहे. दरम्यान, सदावर्तेंच्या कोठडीत वाढ होणार की जामीन मिळणार याची उत्सुकता आहे. एसटी संपकऱ्यांचे वकील गुणरत्न सदावर्ते यांच्या घराची झाडाझडती सुरु आहे. त्यांच्या घरातून पुरावे गोळा करण्याचं काम



सुरु आहे. मुंबई पोलीस सदावर्ते यांच्या घराचं सीसीटीव्ही फुटेज, रजिस्टर, सदावर्तेंना भेटायला कोण कोण आलेले ते तपासत आहेत. सोबतच पवार यांच्या घरापुढच्या आंदोलकांपैकी कुणी सदावर्तेंच्या भेटीला आलेले का याचाही तपास सुरु आहे. तर दुसरीकडे आज सदावर्तेंची कोठडी आज संपतेय. त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करणार का याचा निर्णय आज होणार आहे.दरम्यान, पवारांच्या घरावर हल्ला करणाऱ्या आंदोलकांच्या नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत. 100 हून अधिक आंदोलकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ज्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आलेयत त्यांना पुन्हा सेवेत घेता येणार नाही अशी भूमिका परिवहनमंत्री अनिल परब यांनी घेतली आहे. तसेच 22 एप्रिलपर्यंत जे कर्मचारी कामावर रुजू होणार नाहीत त्यांच्या जागी कंत्राटी खासगीकरणाचा विचार केला जाईल, असा इशारा अनिल परब यांनी दिला आहे.

## गांजा तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश, मानपाडा पोलिसांची कारवाई

धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथून गांजा आणून डोंबिवलीत विकणाऱ्या त्रिकुटाचा मानपाडा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. मयूर जडाकर, अखिलेश धुळप आणि सुनील उर्फ लोका खजन उर्फ पावरा अशी अटक करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. अटक करण्यात आलेल्या संशयितांमधील मयूर जडाकर याच्या विरोधात या पूर्वी गांजा तस्करीप्रकरणी डोंबिवली पोलीस ठाण्यात दोन तर मध्यप्रदेशमध्ये एक गुन्हा दाखल असून चार महिन्यापूर्वीच जेलमधून सुटला होता. डोंबिवलीतील मानपाडा पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी सुनिल तारमळे यांना डोंबिवलीतील देसले पाडा येथील एका घरात विक्रीसाठी गांजाचा साठा करून ठेवल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे सुनील तारमळे यांच्या पथकाने देसले पाडा येथील एका घरात छापा टाकला. या छाप्यात त्यांना सुमारे सहा किलो गांजा आढळून आला. मानपाडा पोलिसांनी हा गांजा ताब्यात घेत घरात आढळलेला मोबाईल फोन, रोख रक्कम, गाडी असा एकूण 1 लाख 87 हजरांचा मुद्देमाल जप्त केला. अटक करण्यात आलेल्या संशयितांकडे चौकशी केली असता हा गांजा त्यांनी शिरपूर येथून विकत आणला असल्याची माहिती दिली. धुळे जिल्ह्यातील शिरपूर लाकड्या हनुमान गाव येथे एका जंगलात




गांजाची शेती केली जाते. तेथून हा गांजा चोरट्या मार्गाने शहरात आणून विक्री केला जात असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. त्यामुळे आता शिरपूर पोलिसांच्या रडारवर हे गांजा तस्कर आले आहेत. हा गांजा शहरातील विद्यार्थी व उच्चशिक्षित लोकांना विकला जात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला असून त्या दिशेने तपास सुरू केला आहे. दरम्यान, गेल्या तीन महिन्यापूर्वी देखील शिरपूर येथील गांजा तस्कर त्रिकूटाला मानपाडा पोलिसांनी अटक केली होती. त्यानंतर आज पुन्हा एकदा शिरपूर मधील दुसरी टोळी मानपाडा पोलिसांच्या हाती लागली आहे.

## कीर्तनकाराचं अश्लील व्हिडीओ प्रकरण; अखेर पुरुष आणि महिला कीर्तनकाराविरोधात गुन्हा दाखल




औरंगाबाद जिल्ह्यातील एका पुरुष आणि महिला कीर्तनकाराचा एक व्हिडीओ सध्या चर्चेत आहे. जिल्ह्यातील शिल्लेगाव पोलीस ठाणे हद्दीतील एका महिला आणि पुरुष कीर्तनकाराचा शारीरिक संबंध प्रस्थापित करत असतानाचा अश्लिल व्हिडीओ व्हायरल झाल्यानं एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

औरंगाबाद जिल्ह्यातील पुरुष कीर्तनकार आणि महिला कीर्तनकार यांचा अश्लील व्हिडिओ व्हायरल झाला होता. अखेर वैजापूरच्या त्या कीर्तनकारासह महिलेविरोधातही धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी शिल्लेगाव पोलीस ठाण्यात रविवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्ञानेश्वर माणिकराव खिल्लारे यांच्या फिर्यादीवरून पुरुष कीर्तनकार याच्यासह त्या समव्यावसायिक महिलेवर शिल्लेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेली अनेक वर्षे पंचक्रोशीत कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध असलेले वैजापूर तालुक्यातील 48 वर्षीय महाराज आणि सिल्लोड तालुक्यातील 40 वर्षीय महिला कीर्तनकार या अश्लील व्हिडिओ क्लिपमध्ये नको त्या अवस्थेमध्ये दिसून आलेत. चित्रफितीमध्ये दिसत असलेल्या महाराजांना एक मुलगा देखील आहे. सदरील व्हिडिओ हा महाराजांनी चित्रित केल्याचंही या चित्रफितीमध्ये पाहायला मिळत आहे. अशा प्रकारचे दोन व्हिडीओ सध्या समाज माध्यमावर व्हायरल झालेले पाहायला मिळत आहेत.

सदरील व्हिडीओ क्लिप मध्ये दिसणारी महिला ही देखील महाराज आहे.

## मानखुर्द : दोन गटांमधील राडा प्रकरणात 7 जणांना अटक



मुंबईच्या मानखुर्दमधील म्हाडा कॉलनीत रविवारी रात्री जमावाकडून तोडफोड करण्यात आली. दोन गटात झालेल्या राड्यात तीस ते चाळीस गाड्यांची तोड फोड करण्यात आली. पोलिसांनी या राड्याप्रकरणी सात जणांना अटक केली आहे. विभागात पोलिसांचा बंदोबस्त असून तणावपूर्ण शांतता आहे. रविवारी, मानखुर्द येथील पीएमजीपी म्हाडा कॉलनीत दोन गटात मोठा वाद झाला. या वादातून काही तरुणांमध्ये मारहाण झाली. त्यानंतर रात्री उशिरा तब्बल 30 ते 40 वाहनांची तोडफोड करण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, दोन्ही बाजूने पोलिसांमध्ये गुन्हा नोंदवण्यात आला. पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत एका गटातील पाच आणि दुसऱ्या गटातील दोघांना असे एकूण सात जणांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. तणाव वाढवणाऱ्या घटना टाळण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

## नाशिकमध्ये 100 कोटींचा जीएसटी घोटाळा? भंगार व्यापाऱ्यांकडून बनावट कागदपत्रांद्वारे फसवणूक

नाशिकमध्ये भंगार व्यापाऱ्यांचा 100 कोटींचा जीएसटी घोटाळा झाला असल्याची माहिती मिळत आहे. बनावट कागदपत्रांद्वारे इनपुट टॅक्स क्रेडिट मिळवत फसवणूक झाल्याची माहिती सूत्रांच्या वतीनं देण्यात आली आहे. कामगारांच्या नावे बनावट कंपन्या दाखवत घोटाळा केल्याचा आरोप करण्यात येत आहे. सध्या या घोटाळ्याच्या चर्चा संपूर्ण नाशकात पसरल्या असून खळबळ माजली आहे.

नाशिकममध्ये भंगार व्यापाऱ्यांनी तब्बल 100 कोटींचा घोटाळा झाल्याचं उघड झालं आहे. बनावट कागदपत्रांद्वारे इनपुट टॅक्स क्रेडिट मिळवत फसवणूक केल्याची माहिती समोर आली आहे. भंगार




व्यापाऱ्यांनी कामगारांच्या नावे बनावट कंपन्या दाखवत घोटाळा केल्याचा आरोप आहे. 200 कोटींहून अधिक व्यवसाय दाखवून 20 कोटी रुपयांचं जीएसटी इनपुट टॅक्स क्रेडिट पदरात पाडल्याचं उघडकीस आलं आहे.

नाशिकमध्ये भंगार आणि स्टील विक्री करणाऱ्या एकाच कुटुंबातील बड्या व्यावसायिकांना बनावट कागदपत्रांद्वारे 20 कोटींचा आयटीसी मिळवत शासनाची फसवणूक केली असल्याचा संशय आहे. हा घोटाळा तब्बल 100 कोटींपर्यंत जाणार असल्याची शक्यता तपास अधिकाऱ्यांच्या सूत्रांनी व्यक्त केली आहे. बनावट कागदपत्रांद्वारे इनपुट टॅक्स क्रेडिट मिळवत फसवणूक झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. कामगारांना अंधारात ठेवून त्यांच्याच नावावर बनावट कंपन्या दाखवून तब्बल 20 कोटी रुपयांचा जीएसटी इनपुट टॅक्स क्रेडिट मिळवण्यात आलं आहे. याप्रकरणी केंद्रीय आणि राज्य जीएसटीच्या नाशिक आयुक्त कार्यालयानं हा घोटाळा उघडकीस आणून संशयितांना चौकशीसाठी समन्स बजावलं होतं.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898